॥कर्दळीवन॥ सेवा संघ आयोजित

# स्वर्गारोहिणी यात्रा 2022

## पांडव जेथून स्वर्गाकडे गेले...



वयोमर्यादा: १८ ते ७० वर्षे

- बद्रीनाथ: ०७ दिवस- १) १४ ते २० ऑगस्ट २) १३ ते १९ सप्टेंबर
- हरिद्वार: १० दिवस- १) १२ ते २१ ऑगस्ट २) ११ ते २० सप्टेंबर

**सहभागी शुल्क :**

**बद्रीनाथ ते बद्रीनाथ - ₹ ३३०००/-** GST 5% **हरिद्वार ते हरिद्वार - ₹ ४००००/-**

**फक्त ₹ १०,०००/- भरुन नोंदणी करा.**

## ऑनलाईन नोंदणी करा -

## www.kardaliwan.com/swargarohini

यात्रेचा ट्रेलर आणि व्हिडिओ मागवा. सर्वांना शेअर करा.

तुमच्या व्हॉट्सअॅप नंबर वर माहिती मागवा.
9657709678 हा आमचा नंबर 'कर्दळीवन सेवा संघ' या नावाने सेव्ह करा आणि त्यावर info - Swargarohini असा मेसेज करा.

कर्दळीवन सेवा संघ, पुणे ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन जिमखाना, पुणे – ०४
मो: 7057617018 / 9371102439 व्हॉटस्अॅप : 9657709678
फोन: 020-25534601 / 25530371 ईमेल : swami@kardaliwan.com

।। ॐ नमः शिवाय ।।

# स्वर्गारोहिणी यात्रा २०२०

## स्वर्गारोहिणी : ज्या मार्गाने पांडव स्वर्गाकडे गेले...

बदरीनाथ मंदिराच्या मागे सुमारे ४० किमी अंतरावर स्वर्गारोहिणी हे ठिकाण आहे. महाभारत युद्ध संपल्यानंतर आणि भगवान श्रीकृष्णाने देह ठेवल्यावर पांडव याच मार्गाने स्वर्गाकडे गेले. वाटेवर प्रथम द्रौपदीने देह ठेवला. त्यानंतर सहदेव, नकुल, अर्जुन आणि भीमाने क्रमाक्रमाने देह ठेवला. शेवटी देवांचा राजा इंद्र आणि मृत्यूची देवता यम यांनी युधिष्ठीराला सदेह स्वर्गामध्ये नेले.

बदरीनाथच्या पुढील सर्व परिसराला बदरीकाश्रम असे म्हणतात. हा अतिशय पावन आणि पवित्र असा भुभाग आहे अशी श्रद्धा आहे. श्रीदत्तात्रेय, श्रीकृष्णाचे बंधू उध्दव, परशुराम, हनुमान आणि अनेक ऋषी, मुनी, ईश्वराचे अवतार, चिरंजीव यांचे वास्तव्य आणि विहार बदरीकाश्रम परिसरामध्ये आहे. या ठिकाणचे पवित्र एवढे आहे की संपूर्ण पृथ्वीवर कोठेही एक लाख वेळा देवाचे नाव घेतले आणि बदरीनाथला फक्त एकदा नाव घेतले तर ते बरोबरीचे आहे असे मानले जाते. जिथे द्रौपदीने देह ठेवला तिथे एकदा केलेला नामजप हा पृथ्वीवरील दहा लाख नामजपाच्या बरोवरीचा आहे. सहदेवाचे ठिकाणी एक कोटी, नकुलाचे ठिकाणी दहा कोटी, अर्जुनाचे ठिकाणी शंभर कोटी आणि भीमाने देह ठेवला तेथे एकदा केलेला नामजप हा पृथ्वीवरील इतर कोणत्याही ठिकाणी एक हजार कोटी वेळा केलेल्या नामजपाच्या बरोबरीचा आहे. स्वर्गारोहिणी येथील नामजपाची तुलनाच करता येणार नाही. आध्यात्मिक श्रद्धांबरोबरच स्वर्गारोहिणी निसर्ग सौंदर्य, जैवविविधता आणि हिमालयाचे विहंगम दर्शन यानेही अत्यंत परिपूर्ण असे ठिकाण आहे. हिमालयाची भव्यता तेथील हिमशिखरे, ग्लेशियर, विविध प्रकारच्या वनस्पती, हिमनद्या आणि तलाव यांनी स्वर्गारोहिणीला जणू स्वर्गासारखेच बनविले आहे. ग्लेशियर्स, ग्रीनरी, हिमालयीन दुर्मिळ औषधी वनस्पती, गुहा, पहाड, हिमनद्या, संगम, धबधबे, वने इ. हिमालयांचे सर्व प्रकारचे अविष्कार स्वर्गारोहिणीच्या परिक्रमेमध्ये अनुभवायला मिळतात. बदरीनाथ १०,००० फूटाहून अधिक उंचीवर असून स्वर्गारोहिणीच्या वाटेवर माणागाव, लक्ष्मीवन, बेंस ऑफ नीळकंठ, चक्रतीर्थ, सत्यपथ, सहस्त्रधारा इ. ठिकाणे लागतात. माणागावाजवळ गणेश गुंफा आणि मुचकुंद राजाची गुहा आहे. स्वर्गारोहिणी ट्रेकच्या मार्गावर नर आणि नारायण पर्वत, नीळकंठ पर्वत, बाळकुम पर्वत लागतात. रस्त्याने जाताने कुबेर पर्वत, चौखंबा पर्वत आणि स्वर्गारोहिणी पर्वत यांच्या हिमशिखरांचे दर्शन होते. या ट्रेकमध्ये सत्यपथ, अलकापुरी, धनो आणि कुबेर हे ग्लेशियर लागतात. अलकनंदा, सरस्वती या नद्यांचे दर्शन होते. सहस्त्रधारा आणि वसुधारा हे धबधबे लागतात. लक्ष्मीवन हे वन लागते. स्वर्गारोहिणी भागिरथी आणि यमुना या दोन नद्यांना वेगळे करते.

- **वैशिष्ट्ये : –** १) अनुभवी आयोजक, मार्गदर्शक आणि शेर्पा
  २) सुसज्ज वैद्यकीय किट, ऑक्सिजन सिलिंडर्स आणि इमर्जन्सी व्यवस्था
- **यात्रेत सहभागी कसे व्हायचे ?**

१) **बदरीनाथ येथे –** आपण यात्रेच्या पहिल्या दिवशी थेट बदरीनाथ येथे दुपारी ४ नंतर पोहोचावे. तेथे निवास आणि भोजनाची व्यवस्था केलेली आहे. यात्रेच्या अखेरच्या दिवशी सकाळी १० वाजता आपण चेक आऊट करून आपली यात्रा समाप्त होईल.

२) **हरिद्वार येथे –** यात्रेच्या पहिल्या दिवशी हरिद्वार येथे दुपारी ४ नंतर यावे. तेथे निवास आणि भोजनाची व्यवस्था केलेली आहे. यात्रेच्या अखरेच्या दिवशी सकाळी १० वाजता आपण चेक आऊट करून आपली यात्री समाप्त होईल.

### बँक खात्याची माहिती

खात्याचे नाव :– कर्दळीवन सेवा संघ एल. एल. पी (Kardaliwan Seva Sangh LLP)

बँकेचे नाव :– बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना पुणे शाखा, चालू खाते क्र. **60351921286**

**IFSC Code : MAHB0000003**

•

सहभागी शुल्क

१) **बदरीनाथ ते बदरीनाथ – ₹ ३३,०००/– (६ रात्री आणि ७ दिवस)**

**बॅच १ : – १४ ते २० ऑगस्ट** **बॅच २ : – १ ते ७ सप्टेंबर** **बॅच ३ : – ७ ते १३ सप्टेंबर**

- **पॅकेजची माहिती**

१) निवास आणि भोजन व्यवस्था बदरीनाथ येथे पहिल्या दिवशी आणि यात्रा परत आल्यावर.

२) स्वर्गारोहिणी यात्रा ट्रेक सर्व व्यवस्था, तंबू निवास, भोजन व्यवस्थेसह.

२) **हरिद्वार ते हरिद्वार – ₹ ४०,०००/– (९ रात्री आणि १० दिवस)**

**बॅच १ : – १२ ते २१ ऑगस्ट** **बॅच २ : – ११ ते २० सप्टेंबर**

- **पॅकेजची माहिती**

१) हरिद्वार येथे पहिल्या आणि नवव्या दिवशी हॉटेलमध्ये निवास व्यवस्था.
२) हरिद्वार ते बदरीनाथ आणि परत अशी वाहन व्यवस्था. हरिद्वार ते हरिद्वार भोजन व्यवस्था.
३) बदरीनाथ येथे पोहोचल्यापासून बदरीनाथ वरून निघेपर्यंत स्वर्गारोहिणी यात्रा, सर्व व्यवस्था, तंबूनिवास, भोजन व्यवस्थेसह.

- **सहभागी शुल्क दोन टप्प्यामध्ये भरता येईल.**

**१. नोंदणी अर्ज बरोबर ₹ १०,०००/-** **२. यात्रा प्रारंभ तारखेपूर्वी २० दिवस उरलेली रक्कम**

# यात्रा कार्यक्रम

**बदरीनाथ ते बदरीनाथ**

- **पहिला दिवस :-** बदरीनाथ येथे पोहोचणे व मुक्काम

❖ **ट्रेक प्रारंभ**

- **दुसरा दिवस :-** लक्ष्मीवन १२ किमी
- **तिसरा दिवस :-** चक्रतीर्थ -१० किमी
- **चौथा दिवस :-** सत्यपथ + स्वर्गारोहिणी पॉईंट - पुन्हा चक्रतीर्थ १० किमी
- **पाचवा दिवस :-** लक्ष्मीवन मुक्काम - १० किमी
- **सहावा दिवस :-** बदरीनाथ (माणागाव मार्गे) - १४ किमी

❖ **ट्रेक समाप्त**

- **सातवा दिवस :-** बदरीनाथ चेक आऊट सकाळी १० वाजता.

**हरिद्वार ते हरिद्वार**

- **पहिला दिवस :-** हरिद्वार आगमन व मुक्काम
- **दुसरा दिवस :-** बदरीनाथ आगमन व मुक्काम
- **तिसरा दिवस :-** बदरीनाथ मुक्काम
- **चौथा दिवस :-** लक्ष्मीवन
- **पाचवा दिवस :-** चक्रतीर्थ
- **सहावा दिवस :-** सत्यपथ + स्वर्गारोहिणी पॉईंट - पुन्हा चक्रतीर्थ
- **सातवा दिवस : -** लक्ष्मीवन
- **आठवा दिवस : -** बदरीनाथ मुक्काम
- **नववा दिवस : -** हरिद्वार आगमन व मुक्काम
- **दहावा दिवस : -** हरिद्वार चेक आऊट सकाळी १० वाजता

**विशेष सूचना : - यात्रा कार्यक्रम नियोजित आहे. काही अपरिहार्य कारणे, नैसर्गिक समस्या, दरडी कोसळणे, गाडी ब्रेक डाऊन होणे, रस्ता बंद होणे, राजकीय समस्या, आंदोलने इ. आयोजकांच्या मर्यादांपलिकडे काही घटना घडल्यास कार्यक्रमपत्रिकेमध्ये बदल घडू शकतो याची कृपया नोंद घ्यावी. त्यावेळी सर्व प्रकारचे सहकार्य करावे लागेल.**

- **नोंदणी कशी करावी ?**

१) नोंदणी अर्ज आणि अंडरटेकींग अर्ज पूर्ण भरून, सही करून सोबत आधारकार्ड, पॅनकार्ड आणि दोन फोटो द्यावेत.

२) नोंदणीच्या वेळी रु. १०,०००/– एवढी रक्कम भरावी लागेल.

३) यात्रेच्या तारखेआधी २० दिवस उरलेली रक्कम भरावी लागेल.

**कॅन्सलेशन / रिफंड बद्दल :**

१) एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. भरलेली रक्कम परत मिळणार नाही. यात्रे आधी ३० दिवस आपण बदली व्यक्ती देवू शकता.

२) कोरोना किंवा इतर काही शासकीय किंवा अत्यंत अपरिहार्य कारणांमुळे आमच्याकडून यात्रा रद्द करावी लागली तर ५०००/– प्रक्रिया शुल्क वजा करून बाकी रक्कम परत केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

- **स्वर्गारोहिणी यात्रेसंबंधी महत्त्वाच्या सूचना**

१) प्रत्येक यात्रेकरूने यात्रेदरम्यान समूहाबरोबरच चालायचे आहे. स्वतंत्रपणे किंवा एकट्याने चालता येणार नाही.

२) हिमालयातील उंचीवरील पर्वतरांगामधील ही यात्रा आहे. प्रत्येक यात्रेकरूला यासाठी तयार केलेले नियम आणि सूचना यांचे पालन करावे लागेल. हिमालयामध्ये आपल्याबरोबर असणारे शेर्पा आणि गाईड यांच्याबरोबर सौजन्यपूर्ण प्रेमळ संवाद ठेवावा लागेल. आपल्यासाठी ते सर्व प्रकारचा त्रास सोसून सहकार्य करीत असतात. जरी हा त्यांचा व्यवसाय असला तरीही त्यापलिकडे जाऊन त्यांचेबरोबर आत्मिय वर्तन असणे गरजेचे आहे.

३) नोंदणी करताना यात्रेकरूंनी स्वर्गारोहिणी यात्रा करण्यास शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरूस्त आहेत याची खात्री करून घ्यावी, ही विनंती.

४) स्वर्गारोहिणी यात्रे सारख्या साहसी अध्यात्मिक यात्रांमध्ये काही प्रमाणामध्ये निश्चितच जोखिम असते. प्रत्येक यात्रेकरूने ती नीट समजून घ्यावी आणि आपले जवळचे कुटुंबीय, नातेवाईक यांना त्याची कल्पना द्यावी. नैसर्गिक आपत्ती, बदलते हवामान, अचानक आलेल्या अडचणी आणि अनाकलनीय परिस्थिती यामुळे गंभीर समस्या उद्भवण्याचा संभव असतो. हिमालयातील यात्रांमध्ये जिवित हानी, वित्त हानी अपघात घडण्याचे प्रसंगही येवू शकतात. प्रत्येक यात्रेकरूने पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर ही यात्रा करावी. कोणतीही अनपेक्षित घटना घडल्यास कोणत्याही कारणाने आयोजकांना जबाबदार धरता येणार नाही आणि आयोजकांवर कोणतीही कायदेशीर जबाबदारी असणार नाही याची नोंद प्रत्येक यात्रेकरूंनी घ्यावी, ही विनंती.

५) स्वर्गारोहिणी यात्रेदरम्यान प्रत्येक यात्रेकरूला एक स्लिपिंग बॅग दिली जाईल. यात्रा संपल्यावर ती परत करावी लागेल. यात्रेदरम्यान फक्त शाकाहारी भोजनाचीच व्यवस्था केलेली आहे याची नोंद घ्यावी.

६) कोणताही यात्रेकरू त्याच्या वर्तनामुळे, शारीरिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे यात्रा करण्यास अयोग्य ठरला तर त्याला यात्रेमधून वगळण्याचा, परत पाठवण्याचा अधिकार यात्रा प्रमुखाकडे असेल याची कृपया नोंद घ्यावी. अशा वगळलेल्या व्यक्तींना कोणताही आर्थिक परतावा मिळणार नाही. यावेळी यात्रा प्रमुखाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल.

७) कृपया नोंदणी करण्यापूर्वी विनासंकोच यात्रेची सर्व माहिती समजावून घ्यावी. शंका समाधान करून घ्यावे. त्यानंतरच नोंदणी करावी.

८) कंडी / पालखी तसेच वैयक्तिक मदतनीस शेर्पा अधिक रक्कम भरून उपलब्ध आहेत. ज्यांना आवश्यकता आहे त्यांनी आधी कल्पना द्यावी.

९) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायलयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहिल.

# स्वर्गारोहिणी यात्रेची तयारी आणि कपडे
# व अन्य आवश्यक सामानासंबधी सूचना

**अ)** स्वर्गारोहिणी यात्रेदरम्यान आपण हिमालयामध्ये १०,००० ते १५,००० फूट उंचीवर चालत जातो. हिमालयातील लहरी हवामान, थंड वारे, अवकाळी पाऊस, बर्फातून प्रवास या गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. यात्रेआधीपासून तीन महिने रोज किमान ६ ते ८ किमी चालण्याचा सराव करावा. त्याचबरोबर दीर्घश्वसन आणि प्राणायाम याचा अभ्यास करावा. हिमालयातील यात्रा ही फक्त साहसी नसून आपल्या शारिरीक आणि मानसिक क्षमतांची खडतर परीक्षा घेणारी आहे, हे लक्षात ठेवावे. त्यामुळे आपल्या शरीराची सर्वात जास्त काळजी आपल्यालाच घ्यायची आहे हे प्रत्येक यात्रेकरूने लक्षात ठेवावे. आपल्याबरोबर कमीत कमी सामान तसेच थंडी वाऱ्यापासून, पाऊसापासून रक्षण करणारे कपडे आपल्या बरोबर असावेत. प्रत्येक यात्रेकरूने खालील वस्तू आपल्याबरोबर घ्याव्यात अशी सूचना आहे.

१) कानटोपीसह वाऱ्यापासून संरक्षण करणारे जॅकेट – १
२) पूर्ण बाह्याचे स्वेटर – १
३) लोकरीचे हातमोजे १, लोकरीचे पायमोजे–१, सूती पायमोजे–३
४) पँट– टी शर्ट / सलवार कमीज ३ ते ४ सेट
५) ट्रेकींगसाठी मजबूत शूज – १ त्यासोबत शू लेस –२ (नेहमीचे बूट ट्रेकींगसाठी चालणार नाहीत.)
६) पाण्याची बाटली.
७) सन ग्लास गॉगल.
८) छोटी LED बॅटरी सोबत ४ सेल एक्स्ट्रा.
९) रेन कोट (मोठा आकार)
१०) सामानासाठी मध्यम आकाराची सॅक – १
११) छोटी पाठीवरची ट्रेकींगसाठी मजबूत सॅक.
१२) सन स्क्रिन लोशन.
१३) रबरी स्लीपर्स इ.
१४) कॅमरेचा पाऊच – ज्यात कॅमेरा, पैसे, औषधे, कागदपत्रे ठेवता येतील.

**ब)** यात्रेची सुरूवात दररोज सकाळी ८ च्या दरम्यान होईल. संध्याकाळी ६ पर्यंत पुढच्या टप्प्यावरील कँप वर पोहोचू. सकाळी लवकरात लवकर चालायला सुरूवात करायची आहे.

**क)** यात्रे दरम्यान सावध आणि आत्मविश्वासपूर्वक चाल आवश्यक आहे. अवघड वाटांवर चालताना सर्वांच्या बरोबरीने शेर्पा आणि गाईड यांचे सहकार्य घ्यायचे आहे. एकट्याने कुठलेही धाडस करु नये. यात्रा समूहाने करायची आहे. आपली आणि आपल्या समूहाची काळजी आपल्यालाच घ्यायची आहे.

**ड)** ट्रेकिंग दरम्यान आपले लगेज ७ कि.ग्रॅ. एवढ्या मर्यादेमध्ये असावे. जास्त सामानासाठी चार्जेस द्यावे लागतील.

**इ)** रात्रीचा मुक्काम तंबू मध्ये आहे. चपाती/ पूरी, डाळ, भाजी, भात, लोणचे, पराठे, सूप ,चहा, कॉफी, आणि स्थानिक भाज्या यांचा आहारात समावेश असेल.

## मेडीकल रिपोर्ट विषयी

**प्रत्येक यात्रेकरूने स्वत:चा मेडीकल चेकअप करून घ्यावा. मात्र त्यांनी मेडीकल रिपोर्ट आमच्याकडे सादर करायची आवश्यकता नाही. स्वत:च्या शारिरीक तंदुरूस्तीची यात्रेकरूनी खात्री करावी. त्यासाठी त्यांनी आवश्यक वाटल्यास खालील चाचण्या करून घ्याव्यात अशी सूचना आहे.**

1) Haemogram
2) LFT
3) KFT
4) LIPID Profile
5) TMT and ECG
6) Chest X Ray - PA View
7) Ultra Sound abdomain
8) Uria - R and M/E
9) Pulse / POP / Chest